महाराष्ट्र शासन

# भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक

## (PRE I.A.S. TRAINING CENTRE, NASHIK)

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ आवार, गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन, नाशिक - ४२२ २२२.

दुरध्वनी क्रमांक : ०२५३-२२३०१०० वेबसाईट : www.iasnashik.org.in ई-मेल : iasnasik@gmail.com


## प्रवेश परीक्षा-२०१८

### UPSC नागरी सेवा परीक्षा २०१९ (IAS/IFS/IPS etc.) च्या परीक्षापूर्व प्रशिक्षण-२०१८-१९

केंद्रीय लोक सेवा आयोगाच्या (UPSC) नागरी सेवा परीक्षा-२०१९ च्या पूर्व प्रशिक्षणाकरिता ११ महिने पूर्णवेळ विनामूल्य प्रशिक्षण देण्यासाठी भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक येथे प्रवेशासाठी **रविवार, दिनांक-११.११.२०१८** रोजी प्रवेश परीक्षा फक्त नाशिक केंद्रावर घेतली जाणार आहे.

**१. प्रवेश क्षमता : एकुण ७० पैकी-**

(१) भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक - **६०**

(२) डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे BARTI व्दारा अनुदानीत - **१०**

**२. प्रवेश परीक्षा पध्दत :** प्रवेश परीक्षा एकुण-२०० गुणांची असेल, UPSC नागरी सेवा (पूर्व) परीक्षेच्या अभ्यासक्रमावर आधारीत राहिल.

| विषय | प्रश्नांची संख्या | एकुण गुण | माध्यम | परीक्षेचा कालावधी | परीक्षेचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|
| **Section-I**<br>सामान्य अध्ययन | ५० | १०० | **English** | सकाळी<br>११.०० ते ०१.००<br>वाजेपर्यंत<br>एकुण-०२ तास | वस्तुनिष्ठ<br>Objective type (MCQ)<br>Negative marking<br>one-third (0.33)<br>of the marks assigned to that question |
| **Section-II (C-SAT)**<br>सामान्य अध्ययन | ४० | १०० | **English** | | |
| सामान्य अध्ययन **Section-II (C-SAT)** हा Qualifying Section असल्याने किमान ३३% म्हणजे १०० गुणांपैकी ३३ गुण असणे अनिवार्य आहे. | | | | | |

**३. पात्रतेच्या अटी :**

३.१ उमेदवार महाराष्ट्राचा अधिवासी असला पाहिजे (Domicile of Maharashtra Certificate) किंवा उमेदवार महाराष्ट्र कर्नाटक वादग्रस्त सीमा भागातील रहिवासी असल्यास शासन निर्णय क्र. रा.प्र.व्य.१०९८/(१७१/९८)/म.शि.-१ दिनांक २४.०४.२००० नुसार प्रवेश पात्रता.

३.२ **शैक्षणिक अर्हता :**

३.२.१ मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी परीक्षा उतीर्ण (कोणत्याही शाखेची पदवी) किंवा प्रवेशाच्या अंतिम दिनांकापर्यंत पदवी परीक्षेचे गुणपत्रक आवश्यक आहे.

३.३ **वयोमर्यादा : वय-२१ ते ३२ वर्षे-** खुला संवर्ग, **वय २१ ते ३५ वर्षे-** इ.मा.व./वि.मा.प्र./वि.जा./ भ.ज., **वय-२१ ते ३७ वर्षे-**अनुसूचित जाती व जमाती (सदर वयोमर्यादा युपीएससी प्रमाणे असून दिनांक **०१ ऑगस्ट, २०१९** रोजी उमेदवाराचे वय कमी किंवा जास्त नसावे)

३.४ भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक या केंद्रामध्ये पूर्व/मुख्य परीक्षाकरिता प्रशिक्षण सत्राचा लाभ घेतलेल्या माजी विद्यार्थ्यांना प्रवेश परीक्षेस बसता येणार नाही.

३.५ केंद्राच्या संपूर्ण प्रशिक्षण काळात उमेदवारास नोकरी अथवा इतर अभ्यासक्रमास सहभाग घेता येणार नाही.

३.६ वैद्यकीय पदवी धारकांनी Intership पूर्ण करणे आवश्यक आहे.

**४. अर्ज करण्याची पध्दत :**

४.१ प्रस्तुत परीक्षेसाठी अर्ज फक्त (Online) पध्दतीने स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत.

४.२ ऑनलाईन अर्ज www.iasnashik.org.in या संकेतस्थळाव्दारे दिनांक ०१.०९.२०१८ ते ०३.१०.२०१८ या कालावधीत सादर करणे आवश्यक आहे.

**५. प्रवेश अर्ज शुल्क :** (ऑनलाईन पेमेंट किंवा चलनाव्दारे)

५.१ खुला संवर्ग- रु. ३००/- ५.२ इ.मा.व./वि.मा.प्र./वि.जा./भ.ज./अनुसूचित जाती/जमाती- रु. १५०/-

५.३ ऑनलाईन अर्ज सादर केल्यानंतर डेबिट कार्ड, क्रेडिट कार्ड अथवा नेटबँकिंगव्दारे ऑनलाईन परीक्षा शुल्क अदा करता येईल किंवा

५.४ चलनाव्दारे शुल्क जमा करण्याचा पर्याय निवडल्यास उपलब्ध होणाऱ्या चलनाची प्रत घेऊन भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेमध्ये विहित चलनाव्दारे शुल्क अर्ज सादर केल्याच्या दोन दिवसानंतर परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे. कालावधी दिनांक ०४.०९.२०१८ ते ०६.१०.२०१८ पर्यंत आहे.

**६ प्रवेश परीक्षा संबंधी :**

६.१ प्रवेश परीक्षा अर्ज स्वीकारण्याचा शेवटचा दिनांक ०३.१०.२०१८ असून त्यानंतर वेबलिंक बंद होईल.

६.२ प्रस्तूत परीक्षेचे प्रवेशपत्र उमेदवारास दिनांक २६.१०.२०१८ ते ११.११.२०१८ पर्यंत संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल.

६.३ परीक्षेचा अभ्यासक्रम, परीक्षेसंबंधी सर्व माहिती, सूचना प्रशिक्षण केंद्राच्या www.iasnashik.org.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

ठिकाण : नाशिक
दिनांक : २८.०८.२०१८.

स्वाक्षरी/-
(डॉ. विजय पां. नारखेडे)
संचालक, भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक.